बी.डी.डी. चाळींमध्ये पोलीस विभागामार्फत
पोलिस कर्मचाऱ्यांना दिलेल्या सेवानिवास्थानांबाबत.

महाराष्ट्र शासन
गृहनिर्माण विभाग,
शासन निर्णय, क्रमांक:- बैठक -२०२१/प्र.क.१४८/गृनिप
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई:- ४०० ०३२
दिनांक:- ९ जूलै. २०२१.

प्रस्तावना:-

मुंबई मधील वरळी, नायगांव, ना.म.जोशी मार्ग, शिवडी येथील मुंबई विकास विभाग (बी.डी.डी.) चाळींचा पुनर्विकास जलद गतीने होण्याच्या दृष्टीने आढावा घेण्यासाठी मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दि.२९.६.२०२१ रोजी झालेल्या बैठकीत मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार, बी.डी.डी. चाळींमध्ये पोलीस विभागामार्फत पोलीस कर्मचाऱ्यांना जी सेवा निवासस्थाने दिलेली आहेत, ती त्वरित रिकामी करुन देण्याबाबत व सेवानिवृत्त पोलीस कर्मचारी तसेच दिवंगत पोलीस कर्मचाऱ्यांच्या वारसांना सदरहू पुनर्विकास प्रकल्पांतर्गत कायम स्वरुपी निवासस्थाने कशाप्रकारे उपलब्ध करुन देता येतील यावर उपायोजना सूचविण्यासाठी समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

बी.डी.डी. चाळींमध्ये पोलीस विभागामार्फत पोलीस कर्मचाऱ्यांना जी सेवा निवासस्थाने दिलेली आहेत, ती त्वरित रिकामी करुन देण्याबाबत व सेवानिवृत्त पोलीस कर्मचारी तसेच दिवंगत पोलीस कर्मचाऱ्यांच्या वारसांना सदरहू पुनर्विकास प्रकल्पांतर्गत कायम स्वरुपी निवासस्थाने कशाप्रकारे उपलब्ध करुन देता येतील, यावर उपायोजना सूचविण्यासाठी तसेच तद्नुषंगिक मुद्दयांबाबत सखोल अभ्यास करुन सविस्तर अहवाल शासनास सादर करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे :-

| | | |
|---|---|---|
| १) मा. मंत्री (गृहनिर्माण) | :- | अध्यक्ष |
| २) मा. मंत्री (गृह) | :- | सह अध्यक्ष |
| ३) मा. मंत्री (पर्यटन, पर्यावरण व राजशिष्टाचार) | :- | सदस्य |
| ४) मा.राज्यमंत्री {गृह (शहरी), गृहनिर्माण, परिवहन, माहिती तंत्रज्ञान, संसदिय कार्य, माजी सैनिक कल्याण } | :- | सदस्य |
| ५) अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग | :- | सदस्य |
| ६) प्रधान सचिव (गृहनिर्माण), गृहनिर्माण विभाग | :- | सदस्य |
| ७) सह पोलीस आयुक्त (प्रशासन), मुंबई | :- | सदस्य |
| ८) मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ | :- | सदस्य |
| ९) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) | :- | सदस्य सचिव |

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यांत आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२१०७०९१७४४४९८५०९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Arvind Tulshiram Shete

Digitally signed by Arvind Tulshiram Shete
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Housing Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d33ed79e4d2d2921d0ca79b9de78ffaa75e5ff9801ced3d15f5ca38bf6aab62, serialNumber=822dcc75effe36b1e50f258ebb574ffef985ea24e972434472e9c1b3373aac40, cn=Arvind Tulshiram Shete
Date: 2021.07.09 17:47:07 +05'30'

(अरविंद शेटे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मा. मंत्री ( गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. मंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. मंत्री, (पर्यटन, पर्यावरण व राजशिष्टाचार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा. राज्यमंत्री, गृहनिर्माण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) अपर मुख्य सचिव (गृह) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
७) अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
८) प्रधान सचिव (गृहनिर्माण) यांचे स्वीय सहायक, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई
९) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा), गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई
१०) सह पोलीस आयुक्त (प्रशासन), मुंबई
११) मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई
१२) उप सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) संचालक, मुंबई विकास विभाग चाळी (बी.डी.डी.), सावली इमारत, वरळी, मुंबई.
१४) निवड नस्ती (गृनिप), गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई

********** ***